अतितातडीचे

जा.क्र.नियडणूक शाखा/धा.क्र.१६-२०११ |१०४९१|
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,म.रा.
पुणे-१ यांचे कार्यालय. दिनांक :-३० नोव्हेंबर,२०१२

संदर्भ :-१) भारतीय राज्यघटनेची ९७ वी घटना दुरुस्ती.
२) शासन पत्र क्र.सीएसएल-२०१२/प्र.क्र.६३५/१५-स, दि.२९ नोव्हेंबर २०१२
३) शासन पत्र क्र.सीएसएल-२०१२/प्र.क्र.६३५, दि.२९/११/२०१२

ज्याअर्थी, केंद्र शासनाने राज्यघटनेत केलेल्या ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार दि.१५ फेब्रुवारी, २०१२ पासून सदर तरतुदी आमलात आल्या आहेत. राज्य घटनेतील सदरच्या सुधारणांनुसार ज्या तरतूदी राज्य घटनेतील उक्त तरतुदींशी सुसंगत नसतील अशा तरतूदी तद्नुषंगाने विहित मुदतीत कायदा, नियम व उपविधी ह्यामध्ये सुधारित करणे क्रमप्राप्त आहे, आणि अशा सुधारणा करण्यात न आल्यास दिनांक १५-२-२०१३ पासून राज्यघटनेतील तरतूदी आपोआप लागू होतील अशी राज्यघटनेत तरतूद आहे, तसेच

ज्याअर्थी, ज्या सहकारी संस्थांच्या संचालक मंडळ सदस्यांची संख्या २१ पेक्षा जास्त आहे, मागासवर्गीयांच्या आरक्षणाची पदे घटनेतील नमुद तरतुदीनुसार नाहीत, संचालक मंडळाचा कालावधी पाच वर्षापेक्षा कमी/अधिक असेल, पोटनियमातील विद्यमान तरतूदी राज्यघटनेतील सुधारीत तरतुदीशी विसंगत असतील, अशा सर्व सहकारी संस्थांनी आपल्या पोटनियमात निवडणूक तसेच अन्य प्रयोजनार्थ राज्यघटनेच्या अनुच्छेद २४३ZH ते २४३ZT मधील तरतुदीशी अनुरुप व सुसंगत अशा आवश्यक दुरुस्त्या करुन त्यानंतर संचालक मंडळाच्या निवडणूकीची कार्यवाही करणे आवश्यक आहे, तसेच संबंधीत संस्थांनी आपल्या पोटनियमात अशा सुधारणा करुन न घेतल्यास व दिनांक १५-२-२०१३ नंतर त्या संस्थांचे संचालक मंडळ पुढे कार्यरत राहील्यास ते राज्यघटनेच्या तरतुदींशी विसंगत ठरेल, व अशा संस्थांवर परिणामतः प्रशासकाची नियुक्ती करण्याची कार्यवाही करणे क्रमप्राप्त ठरेल,

त्याअर्थी, महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार मी खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

## निर्देश

९७ व्या घटना दुरुस्तीच्या पार्श्वभूमीवर सहकारी संस्थांनी राज्यघटनेतील सुधारीत तरतुदीनुसार आपल्या पोटनियमात दिनांक १५-२-२०१३ पर्यंत सर्व अनुषंगिक सुधारणा करुन घ्यावी व त्यानंतर नवीन संचालक मंडळाची निवडणूक घेण्याची कार्यवाही करावी.

हे निर्देश आज दिनांक ३०-११-२०१२ रोजी देणेत आले.

(मधुकर चौधरी)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे

प्रत : माहितीस्तव सविनय सादर.
१) मा. सचिव (सहकार), मंत्रालय, मुंबई

प्रत : माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
१) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) आयुक्त, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रनिर्माण, महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) जिल्हाधिकारी (सर्व)
५) कृषि पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
७) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)